# लांजा महाविद्यालयात जागतिक व्याघ्र दिनानिमित्त फेस पेंटिंग स्पर्धा आयोजित

लांजा येथील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक व्याघ्र दिनाचे औचित्य साधून फेस पेंटिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. वाघाची संख्या जागतिक स्तरावर घाटत असून. या साठी सर्व स्तरातून वाघ संवर्धनाचा व संरक्षणाचा प्रयत्न सुरु आहे. जगात फक्त 4000 च्या आसपास वाघ शिल्लक आहेत व त्या पैकी 3000 भारतात आहेत. भारताचा राष्ट्रीय प्राणी असलेला वाघ नामशेष होणे हे खरोखरच लाजिरवाणे असेल. या साठी लांजा महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाने हि अभिनव स्पर्धा आयोजित केली होती. यात वाघा सारखा चेहरा रंगवून, त्याच्या सारखा डरकाळीचा आवाज काढत, वाघ वाचवण्याचा संदेश द्यायचा होता. यात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. रत्नागिरी जिल्हा वन विभागाने या कार्यक्रमासाठी आर्थिक साहाय्य केले.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या विविध शाखेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये यशवंत विद्यार्थी खालील प्रमाणे,

**प्रथम पारीतोषिक - कु शैलेश गुरव** तृतिय वर्ष वाणिज्य **आणि कु कौस्तुभ धनावडे**.तृतिय वर्ष विज्ञान, **द्वितीय क्रमांक - कु सौरभ खानविलकर** आणि **कु सचिन पाटील** प्रथम वर्ष विज्ञान.  तर **तृतिय क्रमांक** - **कु प्राजक्ता सुर्वे आणि कु रुणाली रेडीज** तृतीय वर्ष विज्ञान.

या स्पर्धेचे आयोजन तृतीय वर्ष प्राणीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी केले. प्रा डॉ विक्रांत बेर्डे यांनी त्यांना मार्गदर्शन केले तर प्रा डॉ दिग्विजय लवटे व प्रा डॉ सचिन घोबले यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमा साठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा डॉ अरविंद कुलकर्णी सर  यांनी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ काशिनाथ चव्हाण व विज्ञान शाखा प्रमुख प्रा धनंजय क्षीरसागर यांनी मोलाचे सहकार्य केले.